सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड.

दुरध्वनी क्रं. 02462-234255/फॅक्स क्र 02462-235103
E mail Id--lcb.nanded@gmail.

स्थानिक गुन्हे शाखा, तळ मजला खोली क्रं.11
पोलीस अधीक्षक नांदेड वजिराबाद -431601

**Press Note** दिनांक 24/11/2025

# " खंडणीच्या गुन्ह्यातील सराईत गुन्हेगारांवर मोक्का अंतर्गत कठोर कार्यवाही "

| पोलीस ठाणे | प्रस्ताव पाठविणारे अधिकारी |
|---|---|
| वजिराबाद, नांदेड | **श्री. परमेश्वर कदम, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन वजिराबाद, नांदेड.** |

**मोक्का प्रस्ताव कामकाज करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार**

मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक साहेब, नांदेड
मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक, भोकर
मा. श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड
**यांचे मार्गदर्शनाखाली**
श्री रामेश्वर वेंजने, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग नांदेड शहर.
श्री. उदय खंडेराय, पोलीस निरीक्षक, नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड.
श्री. परमेश्वर कदम, पोलीस निरीक्षक, पो. स्टे. वजिराबाद, नांदेड
श्री राजू वटाणे, सहा.पोलीस निरीक्षक, पो. स्टे. वजिराबाद, नांदेड.
श्री उमकांत पुणे, सहा. पोलीस निरीक्षक, पो. स्टे. वजिराबाद, नांदेड.
पोहेकॉ/शिवसांब मठपती, पोहेकॉ/गजानन कदम, पोहेकॉ/हबीब चाऊस, पोकॉ/रमेश सुर्यवंशी, पोकॉ/दिगांबर मुसळे, पोकॉ/संतोष पोकले, पोकॉ/ज्वालासिंग बावरी, पोकॉ/विलास कदम, पोकॉ/गणेश धुमाळ, पोकॉ/भगवान गिते.

**आरोपीचे नाव**

**01. मनप्रितसिंघ उर्फ सोनु पिता सुरजसिंघ औलख, वय 35 वर्षे रा. गुरुद्वारा गेट नं. 03 नांदेड.**
**02. करमजितसिंघ उर्फ ऋषी पिता मनजितसिंघ भाटीया, वय 35 वर्षे रा. गुरुद्वारा गेट नं. 03 नांदेड.**
**03. कुलविंदरसिंघ उर्फ कुणालसिंघ पिता नानकसिंघ महाजन, वय 28 वर्षे रा. भोईगल्ली चिखलवाडी, नांदेड.**
**04. गणपतसिंघ गेंदासिंघ मठवाले, वय 35 वर्षे, रा. गुरुव्दारा गेट नं. 2 वजिराबाद नांदेड.**

## हकीकत

**मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड** यांनी नांदेड शहरात तसेच जिल्हामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नांदेड जिल्हयातील गुन्हे अभिलेखावरील सक्रिय तसेच वारंवार गुन्हे करणारे सराईत आरोपीची यादी **2+ स्किम अंतर्गत** तयार करुन, आरोपी विरुध्द प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासंबंधाने सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सुचना दिलेल्या आहेत. नांदेड जिल्हयातील गुन्हेगांरावर वारंवार प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन देखील त्यांचे वर्तणात सुधारणा होत नसल्याने नांदेड जिल्हयातील सर्व पोलीस ठाणेदाराकडुन सराईत गुन्हेगारावर उचित प्रभावी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येत आहे.

नांदेड जिल्हामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी, MPDA अंतर्गत सन 2024 मध्ये एकुण 13 रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगाराना कारागृहामध्ये **"स्थानबध्द"** करण्यात आले असून सन 2025 या चालू वर्षामध्ये **32** सराईत गुन्हेगारास कारागृहामध्ये "स्थानबध्द" करण्यात आले आहे. त्याचबरोबर मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी सन 2024-2025 मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 55 प्रमाणे एकुण 150 गुन्हेगारांना हद्दपार केले आहे. तसेच सन 2025 मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 56 प्रमाणे एकुण 22 गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले आहे. कायद्याचा आदर करणारे शांतता प्रिय नागरीकांना त्रास देणारे उपद्रवी गुन्हेगारांवर पोलीसांची बारकाईने नजर असून अशा गुन्हेगारांवर **मोक्का** तसेच **"स्थानबध्द"** व हद्दपारी सारखी कठोर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येत आहे.

सराईत गुन्हेगार नामे 1) मनप्रितसिंघ उर्फ सोनु पिता सुरजसिंघ औलख, वय 35 वर्षे रा. गुरुद्वारा गेट नं. 03 नांदेड. व त्याचे गुन्ह्यातील तिन साथीदार यांनी पोलीस स्टेशन वजिराबाद, नांदेड हद्दीमध्ये दिनांक दिनांक 25.09.2025 रोजी जय दुर्गामाता नवरात्र महोत्सव व्यंकटेशनगर हिंगोली गेट नांदेड येथे तुम्हाला याठीकाणी गरबा चालवयाचा असेल तर आम्हाला रोजचे 10,000/- रुपये हप्ता द्यावा लागेल म्हणून सशस्त्र हल्ला करुन गुन्हा केला होता. त्यावरुन पोलीस स्टेशन वजिराबाद, नांदेड येथे गु.र.नं. 404/2025 कलम 404/2025 कलम 109(1), 308(2),308(5), 352,351(3), 3(5) भारतीय न्याय संहिता सह कलम 4/25, 7/25 शस्त्र अधिनियम प्रमाणे आरोपीतांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे तपासात, गुन्ह्यातील आरोपी हे स्वतःचे व टोळीतील सदस्याचे आर्थिक लाभापोटी संघटीतपणे गंभिर स्वरुपाचे गुन्हे करुन समाजामध्ये दहशत पसरवीत असल्याने सार्वजणीक सुव्यवस्थेस बाधा पोहचत असल्याचे निष्पन्न झाले त्यावरुन श्री परमेश्वर कदम, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन वजिराबाद, नांदेड यांनी नमुद गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन 1999 कलमाचा अंर्तभाव करुन तपास करण्याबाबतचा प्रस्ताव मा. पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या मार्फतीने मा. पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्या कार्यालयात सादर केला होता. प्रस्तावामध्ये काही उणीवा राहणार नाहीत या करीता श्री उदय खंडेराय, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड यांनी महत्वपुर्ण कामकाज पाहीले आहे. नांदेड जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत सराईत पणे गुन्हे करणारे 150 पेक्षा अधिक गुन्हेगारांचे गुन्हेगारी रेकॉर्ड प्रमाणे त्यांच्यावर विविध कायद्याअंतर्गत योग्य ती प्रतिबंधात्मक कार्यवाही प्रस्तावीत आहे.

**मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड** यांनी सदर मोक्का प्रस्ताव मंजूर करण्याबाबतची शिफारस मा. पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचेकडे केली होती. त्यावरुन **मा. श्री. शहाजी उमाप,** पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांनी सदर गुन्ह्यास मोक्का कलमाचा अंर्तभाव करुन तपास, उपविभागीय पोलीस अधिकारी, उप विभाग नांदेड शहर, नांदेड यांच्याकडे देण्यात येत असल्याबाबतचे आदेश दिनांक 24/11/2025 रोजी आदेश पारीत केले आहेत. नमुद गुन्ह्याचा तपास मोक्का अंतर्गत तरतूदी प्रमाणे श्री रामेश्वर वेंजने, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग नांदेड शहर हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड.**